महाराष्ट्र शासन
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☏२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☏२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक:-सीएमए-०४२१/सीआर-०१/२०२१/बारा दिनांक:-१७ जून, २०२२

# -: शुध्दीपत्रक:-

**विषय:-राज्यसेवा पूर्व परीक्षा २०२२- अर्ज सादर करण्यास मुदतवाढ देण्याबाबत**
**संदर्भ:- (१) जाहिरात क्रमांक ०४५/२०२२ राज्यसेवा पूर्व परीक्षा २०२२, दिनांक ११ मे, २०२२**
**(२) आयोगाची घोषणा क्रमांक ०२/५१२३/२०२०/१५, दिनांक १५ जून २०२२**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या विविध स्पर्धा परीक्षांस बसणाऱ्या उमेदवारांचे प्रयत्न / संधी मर्यादित करण्याचा निर्णय आयोगाकडून रद्द करण्यात आला असून आयोगाच्या प्रस्तुत निर्णयास अनुसरुन राज्यसेवा पूर्व परीक्षा २०२२ करीता दिनांक ११ मे २०२२ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीमधील परिच्छेद क्रमांक ७.८ रद्द करण्यात येत आहे.

२. प्रस्तुत परीक्षेच्या जाहिरातीमधील परीक्षेच्या संधीसंदर्भातील तरतुदीमुळे बऱ्याचशा उमेदवारांनी प्रस्तुत परीक्षेस अर्ज सादर केला नसल्याची शक्यता असल्यामुळे तसेच परीक्षेच्या संधी मर्यादित करण्याचा निर्णय रद्द झाल्याने अर्ज सादर करण्यास इच्छुक असणाऱ्या उमेदवारांना परीक्षेस अर्ज करण्याची न्याय्य संधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने विषयांकित परीक्षेस अर्ज सादर करण्यास खालीलप्रमाणे मुदतवाढ देण्यात येत आहे:-

(१) ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याचा व अंतिम दिनांक:- दिनांक २४ जून २०२२ रोजी २३.५९ वाजेपर्यंत

(२) ऑनलाईन पध्दतीने परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक:- दिनांक २४ जून २०२२ रोजी २३.५९ वाजेपर्यंत

(३) भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरावयाचे झाल्यास चलनाची प्रत घेण्याचा अंतिम दिनांक:- दिनांक २५ जून २०२२ रोजी २३.५९ वाजेपर्यंत

(४) भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षा शुल्काचा भरणा करण्याचा अंतिम दिनांक:- दिनांक २७ जून २०२२ रोजी बँकेच्या कार्यालयीन वेळेत

३. जाहिरातीमधील इतर अटी व शर्तीमध्ये कोणताही बदल नाही.

ठिकाण:-मुंबई

सहसचिव, जाहिरात
महाराष्ट्र लोकसेवा आयोग